# जन्मठेप झाल्यावर निर्दोष सुटला तर हा न्याय मानायचा का?

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

गुजरात राज्यात झालेल्या दंगलीच्या खटल्यात कनिष्ठ न्यायालयाने आरोपी माया कोडनानींना मुख्य सूत्रधार म्हणून दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा दिली होती. उच्च न्यायालयाने हा निकाल पूर्ण बदलला आणि माया कोडनानी यांना थेट निर्दोष ठरविले. एका कोर्टाने जन्मठेप दिली आणि त्याच खटल्यात, त्याच माहितीच्या आधारावर दुसऱ्या कोर्टात निर्दोष सोडले तर मग खरा न्याय कुणी दिला असे मानायचे? खालच्या कोर्टाचा निर्णय बरोबर होता की वरच्या कोर्टाचा निर्णय बरोबर होता? कनिष्ठ कोर्टाने निकाल दिल्यावर जे दोषी आढळले त्यांनी उच्च न्यायालयात जर धाव घेतली नसती तर कनिष्ठ कोर्टाचा चुकीचा ठरलेला निर्णय मान्य करून उद्ध्वस्त आयुष्य जगण्याची वेळ त्यांच्यावर आली असती. एखाद्या डॉक्टरचे निदान चुकले तर त्याला फाशीपर्यंत शिक्षा होते, पण ज्या न्याय मंदिरात माणूस शेवटच्या आशेने जातो, तिथेच परस्परविरोधी निकाल दिल्यावरही काहीच का घडत नाही?

भारतात नौदलाचे कमांडर कवास माणेकशाँ नानावटी यांचा खटला अतिशय गाजला होता. त्यांनी आपल्या पत्नीच्या प्रियकराची हत्या केल्याचा त्यांच्यावर आरोप होता. त्या काळात प्रतिष्ठित नागरिकांचे ज्युरी मंडळ न्यायदान करायचे. या ज्युरीपुढे हा खटला चालला आणि आठविरुद्ध दोन मतांनी ज्युरीने कमांडर माणेकशाँ यांना निर्दोष ठरविले. अर्थातच जनतेत जल्लोष झाला. परंतु हा निवाडा सपशेल चुकीचा भासत असल्याचे म्हणत उच्च न्यायालयाने हा खटला स्वत:कडे घेतला. उच्च न्यायालयापुढे पुन्हा युक्तिवाद झाला आणि कमांडर माणेकशाँ यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. या खटल्यानंतर ज्युरीने न्यायदान देण्याची पद्धतच रद्द करण्यात आली.

सर्वसामान्यांना माहीत असलेल्या अनेक खटल्यांत असेच घडले आहे. मुंबईच्या दंगलीतील राधाबाई चाळ हत्याकांडाच्या खटल्यात टाडा कोर्टाने सर्वांना दोषी ठरविले होते. मात्र सर्वोच्च न्यायालयात ते निर्दोष सुटले. बांद्रा येथे झालेल्या घटनेत सलमानला दोषी ठरविल्यावर त्याने केलेल्या अपिलात उच्च न्यायालयाने त्याला निर्दोष घोषित केले.

आज सामान्य माणसाला न्याय व्यवस्था हा एकच आधार वाटतो. तरीही कनिष्ठ न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाण्याची त्याची आर्थिक व मानसिक ताकद नाही. न्यायालयाकडून वकील मोफत देण्याचा कायदा आहे, पण या मोफत वकिलांचा अनुभव विशेष चांगला नसतो. त्यातही न्यायालयात रोजचा जाण्या-येण्याचा खर्च, कागदपत्रांच्या झेरॉक्स काढण्याचा खर्च, नोकरीचे तास बुडवून सातत्याने कोर्टात हजर राहिल्यास ओढावणारे संकट या सर्व विवंचना त्याच्यापुढे असतात. त्यामुळे जेमतेम कनिष्ठ न्यायालयाची पायरी गाठून तो थबकतो. कोर्टाचा न्याय मान्य करतो. अपील करणे त्याला परवडतच नाही. अशा स्थितीत जर दोन न्यायालये परस्परविरोधी न्याय देत असतील तर अपील करण्याच्या संधीपासून वंचित राहिल्याने त्याच्यावर अन्याय तर होईलच, पण त्याला मिळालेला न्याय हाच खरा न्याय आहे का? असा विचार त्याच्या मनात फेर धरीत राहील. त्याच्या मनातील या संभ्रमावर समाधान मिळणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयानेच एका खटल्यात म्हटले आहे की, न्याय झालाच पाहिजे, पण न्याय समजलाही पाहिजे.

एका खटल्यात कनिष्ठ न्याय अधिकाऱ्याने अगदी स्पष्ट असा चुकीचा निर्णय दिला तेव्हा त्या न्याय अधिकाऱ्याला दंड ठोठावण्यात आला. या न्याय अधिकाऱ्याने सर्वोच्च न्यायालयात न्याय मागितला. सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन चीफ जस्टीस के.जी. बाळकृष्णन, जस्टीस लोकेश्वर सिंग आणि जस्टीस डी.के.जैन यांच्यापुढे हे प्रकरण सुनावणीस आल्यावर त्यावर निकाल देताना खंडपीठाने म्हटले की, कनिष्ठ न्यायालय निकाल देताना चुकले म्हणून न्याय अधिकाऱ्यावर कारवाई होऊ शकत नाही, अशा चुकीच्या निकालावर अपील करण्याचा हक्क प्रत्येकाला आहे. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय योग्यच आहे. पण सतत अपील शक्य होत नाही. त्याचवेळी कनिष्ठ व वरिष्ठ अशा दोन न्यायालयांनी जर अगदी परस्परविरोधी निर्णय दिला तर कोणत्या न्यायालयाचा निर्णय योग्य मानायचा? वरिष्ठ न्यायालय जरी अंतिम असले तरी दोन कोर्ट जर वेगळे निर्णय देत असतील तर दोन्हींपैकी एकाचा निर्णय चुकीचा असू शकतो.

अशा प्रकरणांची अंतर्गत चौकशी होऊन त्याचा गुप्त अहवाल सर्वोच्च न्यायालयाकडे सुपूर्द करून त्यात सर्वोच्च न्यायालय स्वत: पुढाकार घेऊन या प्रकरणांत अंतिम निर्णय घेईल, अशी यंत्रणा उभारली जाऊ शकेल का? अंतर्गत चौकशीसाठी निवृत्त न्यायाधीश/न्यायमूर्ती, ज्येष्ठ वकील, समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती यांची समिती स्थापन करता येईल का? याबाबत विचार होणे गरजेचे आहे. गरिबाला कोर्टात फरफटत न नेता अशा विरोधी निकालांची दखल जर अंतर्गत चौकशी समितीने घेतली तर गरिबाला न्याय मिळेल, न्याय समजेल आणि न्याय झाल्यासारखेही वाटेल.